नियमित दिवाणी दावा क्र. २/२०१७
दिपक वि.. मारोती

## निशाणी क्र.१६ वर आदेश

**१.** वादीने सदर अर्ज त्याचे दाव्यात दुरूस्तीसाठी केला आहे. प्रतिवादीने सदर अर्जावर त्याचे म्हणणे दिलेले आहे. अर्ज व म्हणणे वाचले, युक्तीवाद ऐकला.

**२.** खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे:-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दाव्यातील प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी देणे योग्य आहे का? | होय. |
| २. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ व २:-**

**३.** वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दावा दाखल करतांना त्यांचे विधिज्ञांना काही महत्वाचे गोष्टी सांगण्याचे राहुन गेल्याने वादीला त्याअनुषंगे दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. वादी मागीत असलेली दुरुस्ती दावा जमिनीच्या अनुषंगे झालेली खरेदीखते व त्याअनुषंगे प्रतिवादीला अटक म्हणून दिलेले क्षेत्र व चतु:सिमा अनुषंगेचे झालेले बदल व ताबे याअनुषंगे मजकुर दाव्यामध्ये परिच्छेद ३ नंतर ३-अ म्हणुन अर्जात नमुद परिच्छेद दुरुस्तीअन्वये समाविष्ठ करण्यासाठी अर्जाव्दारे विनंती केली आहे. सदर दुरुस्ती ही दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल घडविणारी नसुन योग्य न्यायनिर्णयासाठी दुरुस्तीस परवानगी मिळणे आवश्यक आहे. तर, प्रतिवादीने त्याचे म्हणण्याव्दारे अर्जास तीव्र विरोध दर्शवून प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलते व पूर्वीपासून वादीस जाणिव आहे. प्रकरण पुराव्यासाठी प्रलंबित असतांना सदर अर्ज मंजुर करणे योग्य होणार नाही असे म्हणणे मांडून खर्चाची मागणी केलेली आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ हा दाव्यातील पक्षकाराना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार परवानगीची संधी देणे असा आहे. दुस-या बाजुचे अपरिमीत नुकसान होत नसेल किंवा त्यांच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयास मुभा आहे जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात काही बदल होणार नसेल तर दुरूस्ती मान्य करता येते.

५. प्रस्तावीत दुरुस्ती ही मुद्दे कायम केल्यानंतर प्रकरण वादीच्या पुराव्यासाठी ठेवलेले टप्पयावर असतांना करण्याचा वादीचा मानस आहे. वादी मागीत असलेल्या दुरुस्ती अथवा समाविष्ठ करू इच्छित असलेला मजकुर ही दावा मिळकतीच्या संदर्भातील काही तथ्य असल्याचे दिसुन येते. वादीने सदरची तथ्य ही वादीच्या वतीने दावा दाखल करतांना त्याच्या विधीज्ञाला सांगण्याचे विसरल्याने ते दाव्यात समाविष्ठ केल्याचे नसल्याचे वादीचे कथन आहे. जरी, प्रस्तुत दावा पुराव्याच्या टप्प्यावर असला तरी वादीतर्फे अदयाप सदर प्रकरणात वादीचा पुरावा दाखल करण्यात आलेला नाही अथवा उलटतपासही झालेला नाही. त्यामुळे, सदर प्रकरण ही सकारात्मरित्या पुराव्यास लागलेले आहे असे म्हणता येणार नाही. जरी, प्रस्तुत प्रकरणात मुद्दे कायम केले असले तरी, दावा दुरुस्तीनंतर प्रतिवादीस त्याचे दुरुस्तीच्या अनुषंगे कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. अर्जातील प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगेचा मजकुर हा घटनेचा तथ्य असल्याने वादीस त्याचे पूर्ण कथन अभिलेखावर आणण्यासाठी दाव्यात दुरुस्तीची परवाणगी देणे योग्य ठरणार आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही आमुलाग्र असा बदल होत नाही अथवा प्रतिवादीचे अपरिमीत असे हानी होईल असेही दिसून येत नाही. या ठिकाणी हे नमुद करावे लागेल की, प्रस्तावीत दुरुस्तीच्या अनुषंगे वादीने विलंब केलेला आहे. मात्र, सदरच्या विलंबामुळे प्रतिवादीचे झालेले नुकसान हे खर्चाच्या स्वरूपात भरून काढता येईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. वादीचा नि.१६ वरील अर्ज रुपये ५००/- खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीस दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरची दुरुस्ती वादीने विहित मुदतीत करावी व दुरुस्त प्रत सादर करावी.

SHARAD NARAYAN GAVALI

Digitally signed by SHARAD NARAYAN GAVALI

दिनांकः- १३.०४.२०२२

**(शरद ना. गवळी)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
रिसोड.

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | **Rohan S. Koshti (L.G.)** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 13.04.2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 13.04.2022 |
| **Order uploaded on** | **:** | **18.04.2022** |